MHNG170006682024

## <u>आदेश निशाणी ०५ खाली</u>
(पारीत दिनांक ०२.०१.२०२६)

**१.** वादींनी सदरचा तात्पुरत्या मनाई हुकुमाचा अर्ज हा दाव्याचा निकाल लागेपर्यंत प्रतिवादींनी दावा मिळकतीचे कोणत्याही प्रकारे हस्तांतरण करु नये याकरिता दाखल केला आहे.

**२.** वादींचे असे म्हणणे आहे की, वादींनी सदरचा दावा पार्टिशन करुन विभक्त कब्जा मिळणेकरिता व हमेशाच्या मनाई हुकूमाकरिता दाखल केला आहे. वादी क्र.१ तसेच वादी क्र.२ व १० ची आई व वादी क्र.३ व ७ ची सासू, तसेच वादी क्र.४ ते ६ व ७, ९ यांची आजी, तसेच वादी क्र.११ ते १४ यांची आई या सर्व सख्या बहिणी होत्या आणि प्रतिवादी क्र.१ व २ तसेच प्रतिवादी क्र.३ चे पती व प्रतिवादी क्र.४ व ५ चे वडील तसेच प्रतिवादी क्र.६ चे सासरे व प्रतिवादी क्र.७ चे आजोबा हे तीन सख्खे भाऊ होते. त्यामुळे वादी व प्रतिवादी एकमेकांचे नातेवाईक आहेत. वादी क्र.१ ताराबाई मेश्राम, मय्यत दमयंती गेडाम व मय्यत उमाबाई शंभरकर तसेच प्रतिवादी क्र.१ व २ व मय्यत ओमप्रकाश बनकर हे एकमेकांचे सख्खे बहीण भाऊ आहेत. त्यांचे वडील फत्तू भिवा बनकर हे दि.१८.१२.१९८५ रोजी मरण पावले व सयाबाई फत्तू बनकर या डिसेंबर-१९९७ ला मरण पावल्या. त्यांच्या मृत्यूनंतर त्यांचे मुले व मुली कायदेशीर वारसदार होते. मय्यत फत्तू

भिवा बनकर यांच्या नावे खालीलप्रमाणे वडीलोपार्जित कब्जे मालकीच्या मौजा जामगाव (रिठी) व मौजा खोलदौडा येथे शेत जमीन होत्या. त्याचे वर्णन खालीलप्रमाणे -

**मौजा जामगाव (रिठी)**

| गट क्र. | | आराजी | जमा | हक्क | खाते क्र. |
|---|---|---|---|---|---|
| १/१ | जुना गट क्र.३० | २.३१ हे. आर. | ४.६५ रू. | वर्ग-१ | १८ |
| १/२ | | २.३० हे. आर. | ४.६५ रू. | वर्ग-१ | ४८ |
| १५/१ | जुना गट क्र.१८ | ०.५५ हे. आर. | १.२० रू. | वर्ग-१ | १८ |
| १५/२ | | ०.५६ हे. आर. | १.२० रू. | वर्ग-१ | १८ |
| | | | ११.७० रू. | | |

**मौजा खोलदौडा**

| गट क्र. | आराजी | जमा | हक्क | खाते क्र. |
|---|---|---|---|---|
| ४८ | ४.४६ हे.आर. | १६.६५ रू. | वर्ग-२ | ३५ |

(सदर शेत जमिनीला यापुढे "**दावा मिळकत**" म्हणून संबोधण्यात येईल).

**३.** मय्यत फत्तू भिवा बनकर यांच्या मृत्यूनंतर वादी क्र.१ व तिच्या दोन बहिणी तसेच प्रतिवादी क्र.१ व २ व मय्यत ओमप्रकाश बनकर यांची नावे वारस म्हणून दावा मिळकतीवर दर्ज झाली. वादींनी कधीही प्रतिवादींच्या लाभात हक्कसोड पत्र केले नव्हते, परंतु, तरीही प्रतिवादींनी महसूली अधिकाऱ्यांशी संगणमत करुन वादींची नावे कमी केली ही बाब वादींच्या लक्षात आल्यावर त्यांनी प्रतिवादींना कायदेशीर नोटीस पाठविला. हिंदू वारसा हक्क कायद्याप्रमाणे पार्टिशन करुन विभक्त हिस्सा करुन देण्याची मागणी केली, परंतु, तरीही प्रतिवादींनी पार्टिशन न करुन दिल्यामुळे वादींनी सदरचा

दावा दाखल केला. प्रतिवादी हे त्यांचे शेत जमिनीवरील नावाचा फायदा घेऊन दावा मिळकत ही त्रयस्थ व्यक्तीला हस्तांतर करण्याचा प्रयत्न करीत आहे. तसे जर प्रतिवादींनी केले तर वादींचे अपरिमीत नुकसान होईल. तसेच सकृतदर्शनी केस ही वादींच्या बाजुने आहे त्यामुळे वादींनी सदरचा अर्ज मंजूर करण्याची विनंती केली आहे.

**४.** प्रतिवादींनी हजर होवून त्यांचे लेखी बयान व सदर अर्जास उत्तर नि.क्र.११ वर दाखल केलेले आहे. प्रतिवादींनी वादींसोबत असलेले नाते संबंध मान्य केले, परंतु, त्यांनी हे नाकारले की, दावा मिळकत ही वडीलोपार्जित मिळकत आहे. प्रतिवादींनी वादींचे इतर सर्व कथन नाकारले. त्यांच्या विशेष कथनात प्रतिवादींनी असे म्हणणे मांडले की, दावा मिळकत ही मय्यत फत्तू भिवा बनकर यांची स्वकष्टार्जीत मिळकत होती. तसेच मौजा खोलदौडा येथील गट क्र.४८ हा त्यांना शासनामार्फत मिळाला होता. मय्यत फत्तू भिवा बनकर यांनी त्यांच्या जिवंतपणी वादींना व सर्व मुलींना रितीरिवाजाप्रमाणे जो पैसा अडका लागतो तो दिला होता. प्रतिवादींनीही तिन्ही बहिणींच्या मुलांच्या लग्नाच्यावेळी योग्य तो पैस खर्च केला होता त्यामुळे मय्यत दमयंती, उमाबाई व वादी क्र.१ ताराबाई यांनी त्यांच्या स्वइच्छेने व स्वसंतोषाने प्रतिवादी क्र.१ व २ च्या लाभामध्ये मौजा जामगाव (रिठी) येथील गट क्र.३०(जुना), गट क्र.१(नवीन), तसेच गट क्र.१८(जुना), गट क्र.१५(नवीन) या शेत जमिनीचा हक्कसोडण्याच्या लेखाद्वारे हक्कसोड पत्र करुन दिले होते. तसेच त्यांनी गट क्र.४८ याचे देखील हक्कसोड पत्र दि.१२.०१.१९९८ साली प्रतिवादींच्या लाभात करुन दिले

होते. त्यानंतर प्रतिवादी क्र.१ व २ तसेच मय्यत ओमप्रकाश यांची नावे महसुली अभिलेखावर आली तसेच त्यांनी सन–१९९९ मध्ये आपसी वाटण्या करुन घेतल्या. त्या आपसी वाटण्यानुसार प्रतिवादींची नावे त्यांच्या त्यांच्या हिस्स्याला नोंदविण्यात आली. वादींना दमयंती, उमाबाई यांनी विना मोबदला हक्क सोडून दिल्याची संपूर्ण माहिती असूनही तसेच त्यानुसार २५ वर्षांपूर्वी महसुली अभिलेखावर फेरफार होऊनही सदरचा खोटा दावा दाखल केला. त्यामुळे वादींनी सकृतदर्शनी त्यांची केस सिद्ध केलेली नाही व त्यामुळे दावाच्या समतोल वादींच्या बाजुने नाही त्यामुळे वादींच्या तात्पुरत्या मनाई हुकूमाचा अर्ज नामंजूर करण्यात यावा.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १ | प्रथमदर्शनी केस असल्याचे वादी शाबित करतो काय ? | **होय** |
| २ | दाव्याचा समतोल वादीच्या बाजूने असल्याचे वादी सिध्द करतो काय ? | **होय** |
| ३ | तात्पुरता मनाई हुकूम न दिल्यास नुकसान होणार असल्याचे वादी शाबित करतो काय ? | **होय** |
| ४ | आदेश काय ? | अर्ज मंजुर करण्यात येतो. |

**५.** वादींचे वकील श्री नागोशे यांनी असा युक्तीवाद केला की, वादी व प्रतिवादी हे एकमेकांचे नातेवाईक आहेत. दावा मिळकत ही वडीलोपार्जित मिळकत आहे त्यामुळे वादी व प्रतिवादी यांचा त्यामध्ये समान हिस्सा आहे. वादींनी दाखल केलेल्या कागद पत्रानुसार जुन्या महसुली अभिलेखावर सर्व वादींची नावे नमूद केलेली आहेत. तसेच प्रतिवादींनी नातेसंबंध मान्य केले

आहे. प्रतिवादींच्या म्हणण्यानुसार मय्यत दमयंती, उमाबाई व वादींनी हक्कसोड पत्र करुन दिले होते, परंतु, तसे कोणतेही हक्कसोड पत्र प्रतिवादींनी दाखल केलेले नाही.**८.** महसुली अभिलेखावर प्रतिवादींची नावे असल्यामुळे ते दावा मिळकतीची विल्हेवाट लावू शकतात त्यामुळे दाव्याचा निकाल लागेपर्यंत तात्पुरता मनाई हुकूम देण्याची विनंती केली.

**६.** प्रतिवादींचे वकील श्री इंगळे यांनी असा युक्तीवाद केला की, दावा मिळकत ही वडीलोपार्जित मिळकत नाही. तसेच सन–१९९९ साली मय्यत दमयंती, उमाबाई व वादी क्र.१ यांनी हक्कसोड पत्र केल्यामुळे प्रतिवादींची नावे त्याचवेळी महसुली अभिलेखावर फेरफार झाली व सन–१९९९ पासून प्रतिवादींची नावे महसुली अभिलेखावर नोंद आहे. हक्कसोड पत्र केल्यानंतर प्रतिवादींनी दावा मिळकतीमध्ये आपसी वाटण्या करुन घेतल्या व त्यानुसार महसुली अभिलेखावर फेरफार घेण्यात आला. त्यामुळे वादींनी त्यांची केस सकृतदर्शनी सिद्ध केलेली नाही त्यामुळे त्यांनी अर्ज फेटाळण्याची विनंती केली आहे.

**<u>मुद्दा क्र. १</u> :–**

**७.** संपूर्ण वादपत्र व प्रतिवादींचे लेखी बयान याचे वाचन केले असता आणि अभिलेखावर दाखल असलेल्या कागदपत्रांचे अवलोकन करता असे निर्दशनास येते की, वादींच्या म्हणण्यानुसार दावा मिळकत ही मय्यत फत्तू बनकर यांची वडीलोपार्जित मिळकत आहे व वादींचा त्यामध्ये समान हिस्सा आहे. या उलट प्रतिवादींनी दावा मिळकत वडीलोपार्जित मिळकत नसल्याचे कथन केले. तसेच पुढे असे कथन केले की, वादी क्र.१, दमयंती व

उमाबाई यांनी हक्कसोड पत्र करुन दिले असल्यामुळे दावा मिळकतीवर वादींचा कुठलाही हक्क नाही.

८. वादींनी सकृतदर्शनी केस सिद्ध करणेकरिता दावा मिळकतीचे सन–१९८२ चे फेरफार पंजीची प्रमाणीत प्रत तसेच दावा मिळकतीचे जुने ७/१२ उतारे अभिलेखावर दाखल केले. सदर दस्तांचे काळजीपूर्वक अवलोकनकरिता असे निदर्शनास येते की, मय्यत फत्तू बनकर यांच्या मृत्यूनंतर प्रतिवादी क्र.१ व २ तसेच मय्यत ओमप्रकाश व वादी क्र.१ तसेच मय्यत दमयंती, मय्यत उमाबाई यांची नावे महसुली अभिलेखावर फेरफार झाली होती. सदर दस्तावरुन हे सकृतदर्शनी दिसून येते की, वादी व प्रतिवादींची नावे महसुली अभिलेखावर होती त्यामुळे दावा मिळकत ही वडीलोपार्जित आहे. तसेच जरी प्रतिवादी दावा मिळकत वडीलोपार्जित असल्याचे नाकारत असले तरी त्यांच्या म्हटल्यानुसार वादी क्र.१ मय्यत दमयंती व मय्यत उमाबाई यांनी हक्कसोड पत्र लिहून दिले होते. याचाच अर्थ जर वादी क्र.१, मय्यत दमयंती व मय्यत उमाबाई यांनी हक्कसोड पत्र लिहून दिले आहे तर प्रतिवादीला हे मान्य आहे की, त्यांचा दावा मिळकतीमध्ये हिस्सा होता. तसेच प्रतिवादींनी त्यांच्या लेखी बयानानुसार कोणतेही हक्कसोड पत्र अभिलेखावर दाखल केलेले नाही, परंतु, त्यांनी त्या संदर्भातील फेरफार पंजी अभिलेखावर दाखल केलेली आहे. त्या फेरफार पंजीचे अवलोकनकरिता दि.२५.०१.१९९८ रोजी मय्यत दमयंती व मय्यत उमाबाई, वादी क्र.१ ताराबाई यांनी हक्कसोड लेखानुसार त्यांचा हक्क सोडल्यामुळे त्यांनी नावे दावा मिळकतीवरुन कमी करण्यात येते. माझ्या

मते, वरील चर्चेवरुन व वादीच्या कागदोपत्री पुराव्यावरुन हे सकृतदर्शनी दिसून येते की, दावा मिळकत वडीलोपार्जित मिळकत आहे. या उलट प्रतिवादींनी हक्कसोड लेख अभिलेखावर दाखल केलेले नाही. त्यामळे त्या संदर्भातील निर्णय हा संपरीक्षेदरम्यान संपूर्ण पुराव्यानंतर निर्णीत होऊ शकतो. सद्यस्थितीत दावा मिळकत ही वडीलोपार्जित असल्याचे सकृतदर्शनी दिसून येत असल्यामुळे तसेच वादी व प्रतिवादी एकमेकांचे नातेवाईक आहेत त्यामुळे माझ्या मते, वादींनी त्यांची केस सकृतदर्शनी असल्याचे सिद्ध केलेले आहे. त्यामुळे मी मुद्दा क्र.१ यांचे निष्कर्ष होकारार्थी नोंदवितो.

**<u>मुद्दा क्र.२ व ३</u>** :–

**९.** मुद्दा क्र.१ वरील निष्कर्षावरुन वादींनी हा त्याचा खटला प्रथमदर्शनी असल्याचे सिध्द केलेला आहे. त्यामुळे दाव्याचा समतोल हा वादींच्या बाजूने आहे, कारण वादी व प्रतिवादी एकमेकांचे नातेवाईक आहेत. तसेच प्रतिवादींची नावे दावा मिळकतीवर नमूद आहेत. त्यामुळे जर त्यांनी दावा मिळकतीचा त्रयस्थ व्यक्तीला हस्तांतरण केले तर वादींचे न भरुन येणारे नुकसान होईल याउलट प्रतिवादींचे नुकसान होणार नाही. त्यामुळे दावाचा समतोल हा वादींच्या बाजुने आहे. त्यामुळे मी मुद्दा क्र.२ व ३ यांचे निष्कर्ष होकारार्थी नोंदवितो.

**<u>मुद्दा क्र. ४</u> :–**

**१०.** वर नमुद मुद्दे क्र.१ ते ३ च्या निष्कर्षावरुन मी मुद्दा क्र.४ चे उत्तराकरिता खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

नियमित दिवाणी दावा क्र. ४०/ २०२४
ताराबाई दयाराम मेश्राम व इतर
– **विरुध्द** – श्रीराम फत्तु बनकर व इतर
नि.क्र. ०५ खाली.

## <u>आ दे श</u>

१. अर्ज नि.क्र.५ मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादी यांनी दावा मिळकतीतील शेत जमिनींचे दाव्याचा निकाल लागेपर्यंत विक्री पत्र, बक्षीस पत्र व इतर कोणत्याही प्रकारे त्रयस्थ व्यक्तीला हस्तांतर करु नये असा तात्पुरत्या मनाई हुकूमाचा आदेश देण्यात येतो.

LAD SURAJ JANARDAN
Digitally signed by LAD SURAJ JANARDAN
Date: 2026.01.02 12:10:54 +0530

भिवापूर.
दिनांक :- ०२.०१.२०२६.

**(एस. जे. लाड)**
दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर,
भिवापूर.

*******

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. File of judgment/order are word to word as per original judgment/order.

Name of Stenographer : K. S. Kathane
to C.J.J.D. & J.M.F.C., Bhiwapur.